# जीवनासाठी उचललेले एक पाऊल

लेखक एल्मर मरडोक्

**परमेश्वर एक अद्भुत परमेश्वर आहे. तो तुमच्यावर प्रेम करतो आणि तुमचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करित आहे.**

**कदाचित**

**हया**

**काही वस्तू**

**त्याकरिता**

**बाधक**

**आहेत.....**




तुमच्या समस्या तुम्हाला परमेश्वराविषयी विचार करण्यापासून दूर ठेवतात. परंतु हया पुस्तिकेचे अध्ययन केल्यास परमेश्वर तुम्हाला काही सांगत आहे ते तुम्हाला कळेल.

**बहुधा, परमेश्वराविषयी तुम्हाला माहिती आहे, परंतु येथे प्रमुख तीन सत्य दिलेले आहेत ज्यावर तुम्ही आता मनन करायला हवे .**

..... तो सर्वज्ञानी आहे, तुमच्या जीवनाकरिता योग्य काय ते तो जाणतो.

..... तो पवित्र आहे, आणि तो पापाचे समर्थन करु शकत नाही, तर तो त्याचा न्याय करील.

..... तो करुणामय आहे, म्हणून तो न्याय थांबवू शकतो आणि तुम्हाला क्षमा करु शकतो. कारण येशू ख्रिस्ताने तुमच्याकरिता क्रुसावर आपला प्राण दिला. "तुजसमान देव कोण आहे? तू अधर्माची क्षमा करितोस" . (मीखा ७ : १८)

परमेश्वरापर्यंत पोहचण्याचा एकमात्र मार्ग येशू ख्रिस्त आहे कारण त्याने म्हंटले, "....मार्ग, सत्य व जीवन मीच आहे, माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही" .
(योहान १४:६)

तुम्ही कधी हैराण झाला आहा काय?....

**जगण्याचा सर्वोच्च उद्देश काय आहे ?**

कित्येक लोक असे म्हणतात,माझ्या जगण्याचा उददेश, माझ्या कुटूंबाचा आनंद, आनंदित राहणे, एक चांगले जीवन व्यतीत करणे, परिपूर्ण राहणे, इ.आहे. हे सगळे चांगले आहे. परंतु शास्त्र आम्हाला असे सांगते की, सर्वोच्च उद्देश ' येशू ख्रिस्तावर विश्वास ठेऊन परमेश्वराला जाणून घेणे' हा आहे. तुम्ही परमेश्वराला एका मित्राप्रमाणे जाणून घेऊ शकता.

"सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला व ज्याला तू पाठविले त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे". योहान १७:३

**हा अदभुत परमेश्वर तुमच्याकरिता खालील गोष्टी करु इच्छितो :-**

- तुमच्या सर्व पापांची क्षमा करणे
- तुमच्या जीवनाला एक नवीन अर्थ देणे
- तुमच्या मृत्युनंतर तुम्हाला स्वर्गात नेणे.

तुम्ही स्वतः ला जेव्हा परमेश्वराचा एकुलता एक पुत्र येशू ख्रिस्त याच्या प्रती समर्पित करता तेंव्हा हया सर्व गोष्टी तुम्हाला मिळतील.

जर तुम्ही प्रेम व दयेच्या या प्रस्तावाला अस्विकृत करता, तर तुम्ही स्वतःला परमेश्वराच्या न्यायाच्या अधीन करीत आहा (योहान ३.३६)


त्यामुळे एका महत्वपूर्ण प्रश्नाचा सामना तुम्ही कराल :

**तुमच्या जीवनाला कोण मार्गदर्शन देतो ?**

तुम्ही किंवा येशू ? पुढील काही पाने तुम्हाला हे जाणून घेण्यास मदत करतील.

## प्रत्येक व्यक्ति खालील पाच चरणांपैकी एकावर आहे.

तुमचा व्यवहार परमेश्वरापासून तुमच्या दूरीचे निर्धारण करतो. प्रत्येक "चरण" देवाच्या प्रति तुमच्या व्यवहाराचे वर्णन करतो-परमेश्वरापासून दूर किंवा जवळ ज़ेंव्हा एक व्यक्ति सत्याचा शोध करीत होता, तेंव्हा त्याला शिकवतांना प्रभु येशू ख्रिस्ताने असे म्हंटले, " तू परमेश्वराच्या राज्यापासून दूर नाही.( मार्क १२ : ३४)




***तुम्ही यापैकी कोणत्या चरणावर आहात ?***

## निश्चिंतता :

**तुम्ही उदधार व येशू ख्रिस्त यांच्याविषयी खूप काही समजून घेऊ शकता. पण हया महत्वपूर्ण सूत्रांची तुम्ही चिन्ताच करीत नाही.**

एक निश्चिंत व्यवहार तुम्हाला परमेश्वराची ओळख करुन घेण्यापासून दूर ठेऊ शकतो, परंतु हा तुमच्याविषयी चिंता करण्यापासून परमेश्वराला थांबवू शकत नाही. कारण बाईबल मध्ये असे लिहीले आहे, “ परंतु देव आपणांवरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतांनाच ख्रिस्त आपणांसाठी मरण पावला.” (रोमकरांस पत्र ५.८)





*तूम्ही ह्या चरणावर आहात काय ?*

## चिंतन :

तुम्ही आपल्या आंतरिक व आत्मिक आवश्यकतेप्रती जागरुक आहात आणि त्यांच्याकडून उत्तर मिळवू इच्छिता.

कदाचित एक मृत्यु, सूटपत्र, बेरोजगार होणे, आजार, किंवा एका मित्राचा प्रभाव तुम्हाला एक पोकळी व आत्मिक आवश्यकतेचा बोध करुन देत असेल. ही पोकळी प्रभु येशू  ख्रिस्तासोबत व्यक्तिगत संबधाच्या कमतरतेमुळे आहे. प्रभु असे म्हणतो, “ तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावें माझ्या शोधास लागाल, तेंव्हा मी तुम्हास पावेन. (यिर्मया २९.१३)




*तुम्ही या चरणावर आहात काय ?*
*योग्य चिंतन योग्य मार्गदर्शक बनू शकते ?*

## दोष-सिध्दी :

तुमच्यामध्ये एक आत्मिक बेचैनी आणि दोषभाव आहे ज्याला पवित्र आत्मा तुम्हावर तुमचे पाप व पोकळीला प्रकट करण्याद्वारे व्यक्त करतो.

"तुम्ही चांगले बनून" किंवा "जितके श्रेष्ठ तूम्ही करु शकता ते करीत" स्वर्गात जाण्याची आशा ठेवीत आहात काय? तुम्ही स्वतःला असा प्रश्न विचारा " मी खरच आवश्यक तेवढा चांगला आहे काय?" मी परमेश्वराच्या आज्ञा - १०० टक्के-विचार, शब्द व कार्यात पालन करतो काय? जर असे आहे तर तुम्ही तुमच्या चांगल्या जीवनामुळे स्वर्गात जाऊ शकता. मत्तय १९:१७-१९

"…. कारण नियमशास्त्राच्या द्वारे पापाची जाणीव होते" (रोमकरास पत्र ३.२०)

**आपण किती चांगले आहोत हे जाणून घेण्याकरिता देवाच्या चांगुलपणात परिक्षा द्या <u>दहा आज्ञा ।</u>**

**माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत.**

तू आपल्यासाठी कोरीव मूर्ती करुं नको.

तुझा देव परमेश्वर हयाचे नाव व्यर्थ घेऊ नको.

तू शब्बाथ दिवसाची आठवण ठेऊन तो पवित्रपणे पाळ.

तू आपल्या बापाचा व आईचा मान राख.

तू खून करु नको.


तू व्यभिचार करु नको.

तू चोरी करु नको

तू आपल्या शेजाऱ्याविरुध्द खोटी साक्ष देऊ नको, तू लोभ धरू नको. **निर्गम** २०:३-१७

(बाइबल)

तुम्हाला किती अंक मिळाले? १०० टक्क्यांवर सफलता आहे. अनुपात असल्यास परमेश्वर दर्जा देत नाही. याकोब २:१० यात असे लिहीले आहे., “कारण जो कोणी संपूर्ण नियमशास्त्र पाळून एका नियमाविषयी चुकतो तो सर्वांविषयी दोषी होतो” नियमशास्त्र एका फुग्याप्रमाणे आहे. एक छिद्र पूर्ण नाश करु शकतो.




तूम्ही या चरणावर आहात काय ?
दोष-सिध्दि मार्गदर्शन करू शकते....

**त्यानंतर पुढील महत्वाच्या प्रश्नांवर लक्ष द्या.:-**

१. तुम्ही परमेश्वराच्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करुन पाप केले आहे काय? ☐ होय ☐ नाही.

२. तुमचे पाप तुम्हाला कधी त्रास देते काय? ☐ होय ☐ नाही

३. किती? ☐ कमी? ☐ खूप? ☐ त्याविषयी काय करणे पर्याप्त आहे?

**पश्चाताप :-**

तुमचे हृदय परिवर्तन झाले आहे आणि सर्व पापांना सोडून देण्याचा निर्णय तुम्ही घेतला आहे आणि स्वतंत्रपणे परमेश्वरासोबत आपले जीवन जगत आहा.

**पश्चाताप...** आपल्या हृदयाच्या सिंहासनावरुन उतरण्याचे कार्य आहे यासाठी की तिथे येशू ख्रिस्ताने आपले योग्य स्थान घ्यावे

**पश्चाताप...** आत्मिक यू-अर्न (घुमाव) आहे व तुम्ही विश्वास करण्यापूर्वी तो आवश्यक आहे.


**पश्चाताप...** केवळ स्वतःवर खेद प्रगट करणेच पर्याप्त नाही. पश्चातापासोबत दुःख सुध्दा होते. परंतु पश्चातापाशिवायही आपण दुःखी होऊ शकतो. काही लोक आपल्या पापांच्या परिणामांवर खेद प्रगट करतात. परंतु स्वतः "पाप" असे करित नाही ईश्वरप्रेरित दुःख तारणदायी पश्चातापास कारणीभूत होते. त्याबद्दल वाईट वाटत नाही; पण ऐहिक दुःख मरणास कारणीभूत होते. २ करिंथ ७:१०

**पश्चाताप....**सर्व पापांचा त्याग करणे आहे. काही लोक विशिष्ट पापांपासून दूर राहतात. आपल्या पापांमुळे परमेश्वर अप्रसन्न होईल हया कारणाने नाही, तर केवळ व्यक्तिगत कारणांनी त्या पापात सुधारणा करतात.(उदा. स्वास्थ्य, प्रतिष्ठा, कुटूंब, व्यापार इ.)

**पश्चाताप...** चे वर्णन नवीन करारात ५५ पेक्षा जास्त वेळा आले आहे.

येशू ने स्वतः असे म्हंटले आहे, “जर तुम्ही पश्चाताप केला नाही तर तुम्हा सर्वांचा त्यांच्यासारखा नाश होईल.”(लूक १३.३)

**तेव्हा पश्चाताप एवढा महत्वपूर्ण का आहे ?**




**जर तुम्ही या चरणावर आहात,**
**तर हे पृष्ठ पलटवा,**
**आणि अंतिम चरणावर जा.**

## प्रभु येशू ख्रिस्तात वाचण्याचा विश्वास :

तुम्हा सर्वांना पूर्ण समर्पणाकरिता तयार करण्यात आले आहे. आणि आता आपणा वर प्रभु येशू ख्रिस्ताचे शासन आहे.

आत्म-शासनाद्वारे तुमच्या हृदयाच्या सरकारचे प्रभु येशू  ख्रिस्तात परिवर्तन झाले आहे. कारण ख्रिस्त परमेश्वर आहे, जो क्रूसावर मारला गेला आणि तुमच्याकरिता तो मेलेल्यांतून जीवंत झाला. तो तुमच्या नोकरी, कूटूंब, वित्त, जिविका आणि तुमच्या स्वतःच्या जीवनापेक्षाही खूप महत्वपूर्ण आहे. मत्तय १०: ३७-३९,लूक ९:५७-६२, १ करिंथ १५:३,४

लूक १४:२६ मध्ये येशू म्हणतो कि, “जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई,बायको,मुले,भाऊ,व बहिनी हयांच्या आणि आपल्या जिवाचाही द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही.”

जेंव्हा तूम्ही अशाप्रकारे समर्पण करता आणि पूर्णपणे त्याच्यावर विश्वास ठेवता तर परमेश्वर आपल्या आत्म्याला तुमच्यामध्ये टाकेल आणि तुमचा त्यांच्या कुटूंबात जन्म होईल. परमेश्वर आता तुमचा प्रेमी पिता बनता आणि तो तुमच्यात त्याला आवडणारे कोणतेही परिवर्तन करु शकतो.

“प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेव तर तुझे..... तारण होईल”. (प्रेषित १६.३१)

“ आपण विश्वासाने नीतीमान ठरविलेले आहो म्हणून आपणाला आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताच्या द्वारे देवाबरोबर शांती आहे”. (रोमकंरास पत्र ५.१)

आणि त्याच्या वधस्तंभावरील रक्ताच्या द्वारें शांति करून तद् द्वारें सर्व.....

कलस्सैरांस पत्र 1:20

मन परिवर्तन झाल्यानंतर येशू ख्रिस्त आपल्या जीवनाचा प्रभु होतो. आता तो आपल्या आत्म्यात वस्ती करतो आणि ख्रिस्ती जीवनाचा स्त्रोत व सामर्थ्य देणारा बनतो.

**तारणाचा विश्वास**



**कारण परमेश्वराने तुम्हाला या चरणावर पोहचवले आहे म्हणून आजच येशू ख्रिस्तासोबत वचनबध्द व्हा.....**

**आपल्या स्वतःच्या शब्दामध्ये परमेश्वराशी बोला...**

**आपल्या पापांचा अंगीकार करा.** प्रत्येक पापाचे नाव घेऊन मोठयाने स्वीकार करा जसे गर्व, लैंगिक पाप, खोटे बोलणे, अक्षमशीलता, लोभ, कपट इत्यादि

**परमेश्वराला सांगा कि तुम्ही येशु वर विश्वास करीत आहा-** सर्व ठाऊक असलेली पापे व त्या पापांचे मूळ म्हणजे स्वार्थ, हा सोडण्यासाठी तयार आहा.

**परमेश्वराला सांगा कि तुम्ही येशूवर विश्वास करीत आहा -** ज्याला त्याने (परमेश्वराने) मेलेल्यांमधून उठविले आणि त्याला तुमच्या जीवनात तुमचा प्रभु व तारणारा म्हणून ग्रहण करीत आहा.

तो आपले वचन पूर्णत्वास नेईल, तुम्हाला क्षमा करेल आणि तुम्हाला नवीन बनवून तुमच्या जीवनात येईल.

तुम्ही वरील वचनबध्दता आपल्या तीव्र भावनांसोबत किंवा त्या व्यतीरिक्त व्यक्त करु शकता. तुमची प्रतिक्रिया ही तुमचा स्वभाव, पृष्ठभूमी व परमेश्वरापर्यंत तुमची धाव याद्वारे निश्चित केली जाते. तुम्ही जाणता की तुम्ही आपली इच्छा परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी समर्पित केलेली आहे आणि हे आवश्यक आहे. सर्व भावना समाप्त होतील, परंतु तुमच्या मनाचा निर्णय सर्वदा सारखाच राहील.

**त्याची मुले बनण्यासाठी आणि तुमच्यामधील त्याच्या नवीन जीवनासाठी परमेश्वराला धन्यवाद द्या. तुम्ही आताच प्रार्थना करु शकता.**

## चार कारणे ज्याच्याद्वारे तुम्ही जाणू शकता कि तुम्ही तारण (उद्धार) प्राप्त केलेले आहे.

१. तुम्ही पश्चाताप आणि विश्वास करण्यासाठी परमेश्वराच्या आज्ञेचे पालन केले. आणि तो आपले वचन पूर्ण करण्यास विश्वसनीय आहे, “ देवाच्या (परमेश्वराच्या) पुत्राच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या तुम्हास सार्वकालिक जीवन लाभले आहे हे तुम्हास कळावे म्हणून मी हे तुम्हास लिहिले आहे.”
   १ ले योहान ५:१ ३

२. ख्रिस्ताने वाहिलेल्या रक्तावर तुम्हाला भरवसा आहे. “त्याच्या कृपेच्या समृध्दीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी त्याच्या रक्ताच्या द्वारे खंडणी भरुन मिळविलेली मुक्ती म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा आपल्याला मिळाली आहे.” इफिस १:७

३. तुम्ही तुमच्या जीवनाला चालविणाऱ्या इतर सर्व बाबींना सोडून स्वतःला येशू ख्रिस्ताला देऊन दिले, जो पुनरुत्थित प्रभु आणि सर्वशक्तिमान आहे. “तर ख्रिस्त येशू जो प्रभू हयाला जसे तुम्ही स्विकारले तसे चालत त्याच्यामध्ये चालत रहा.” कलस्सै २:६

४. परमश्र्ववराने त्याचा पवित्र आत्मा तुमच्यामध्ये दिला आहे - म्हणजे तुमच्या आत्म्यामध्ये, आणि जो तुम्हाला खात्री देतो, कि तुम्ही त्याचे आहा - ”तो आत्मा स्वतः आपल्या आत्म्याबरोबर साक्ष देतो की, आपण देवांची मुले आहो”. (रोमकरास पत्र) ८:१ ६.

**येशु ख्रिस्तामधील नवीन जीवन खालील परिवर्तनाला जन्म देतात.**

१. **पवित्र शास्त्र जाणून घेण्याची एक इच्छा** ''तारणासाठी तुमची अध्यात्मिक वृध्दी व्हावी म्हणून नूतन जन्मलेल्या बालकांसारखे निऱ्या दुधाची इच्छा धरा.'' १ पत्र २:२

२. **येशु ख्रिस्ताचे आज्ञापालन करण्याची इच्छा** ''माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल.'' योहान १४:१५

३. **पापाबददल दुःख** आम्ही पापामध्ये अधिक वेळ आनंद करु शकत नाही. ''प्रभु जे आपले आहेत त्यांना ओळखतो आणि जो कोणी प्रभूचे नाव घेतो त्याने अनीतीपासून दूर रहावे.'' २ रे तीमथ्य २:१९

४. **हरविलेल्याविषयी कळकळ** - ज्यांनी आतापर्यंत पश्चाताप केला नाही आणि परमेश्वराला व्यक्तिगत रीतीने ओळखत नाही, त्यांच्याविषयी कळकळ. ''तो तुमचे धीराने सहन करतो. कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चाताप करावा अशी आहे''. २ रे पेत्र ३:९


*अधिक माहीतीसाठी संपर्क करा*

**भारतीय सेवक संगति**

मांऊट रोड, होटल उपवनच्या मागे, सदर, नागपूर -४४०००१

**Bhartiya Sewak Sangati**

66, Mount Road, Behind Hotel Upvan
Sadar, Nagpur-440001 (MS)

www.stepuptolife.com • sutlmail@aol.com